Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# नाशिक जिल्हयातील सटाणा तालुक्यातील रब्बी कांदा उत्पन्न

**डॉ. उत्तम बाबुराव पाथरे**
माजी प्राचार्य,
आसारामजी भांडवलदार आर्ट्स कॉमर्स
आणि विज्ञान महाविद्यालय देवगाव (र.)
जिल्हा छ. संभाजीनगर

**प्रदीप एकनाथ नवले**
संशोधक विद्यार्थी, भूगोल विभाग,
आसारामजी भांडवलदार आर्ट्स कॉमर्स
आणि विज्ञान महाविद्यालय देवगाव (र.)
जिल्हा छ. संभाजीनगर

**गोषवारा:**

प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला खूपच महत्त्व असते. कृषीप्रधान अर्थव्यवस्था असो कि उद्योगप्रधान अर्थव्यवस्था असो प्रत्येक अर्थव्यवस्थेत शेती महत्त्वाचीच मानली आहे. मानवाच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आवश्यक सामग्री पुरविण्याची जबाबदारी शेती क्षेत्रामार्फत समर्थपणे सांभाळली जाते. इतकेच नव्हे तर बहुसंख्य उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल ही शेतीमधूनच प्राप्त होतो. म्हणजेच एका बाजूला जीवनावश्यक गरजांची पूर्तता करणे व दुसऱ्या बाजूला देशाच्या औद्योगिकरणाला सहाय्य करणे अशी दुहेरी भूमिका शेती वटविते. म्हणूनच शेतीला अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे. नाशिक जिल्हयातील सटाणा नगरातील कांदा पिक उत्पन्नाचे विश्लेषण केले असता सन २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत सटाणा तालुक्यात मंडळ निहाय रब्बी कांदा पिक उत्पन्नात बदल आढळतो. रब्बी कांदा पिक उत्पन्नातील प्लॉटची सर्वाधिक वाढ नामपूर मंडळात ११.६३ टक्के आढळून येते तर सर्वात कमी घट ब्राम्हणगाव मंडळात -१०.५२ टक्के निदर्शनास आली आहे. तसेच प्रती हेक्टर रब्बी कांदा उत्पन्नाचा अभ्यास केला असता सर्वाधिक वाढ तहरापूर मंडळात ९.६३ टक्के असून सर्वाधिक घट अनुक्रमे ब्राम्हणगाव मंडळात -६.३६ टक्के एव्हडी आहे. तर सुकवणी पूर्वी रब्बी कांदा पिक उत्पन्नात सर्वाधिक वाढ नामपूर मंडळात ८.५७ टक्के असून सर्वाधिक घट अनुक्रमे ब्राम्हणगाव, वीरगाव, ताहाराबाद, मंडळात -५.७१ निदर्शनास येते. सटाणा तालुक्यातील मंडळ निहाय रब्बी सुकवणी नंतर कांदा पिक उत्पन्न अभ्यासले असता सर्वाधिक वाढ सटाणा मंडळात ८.७६ टक्के इतकी आहे तर सर्वाधिक घट ब्राम्हणगाव मंडळात -५.९१ आढळून येते. तर सुकवणी नंतर रब्बी कांदा पिक हेक्टरी प्रमाण अभ्यासले असता सर्वाधिक वाढ ताहाराबाद ९.६३ टक्के या मंडळात असून सर्वाधिक घट ब्राम्हणगाव -६.३६ टक्के या मंडळात आढळून येते.

**प्रस्तावना :**

प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला खूपच महत्त्व असते. कृषीप्रधान अर्थव्यवस्था असो कि उद्योगप्रधान अर्थव्यवस्था असो प्रत्येक अर्थव्यवस्थेत शेती महत्त्वाचीच मानली आहे. मानवाच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आवश्यक सामग्री पुरविण्याची जबाबदारी शेती क्षेत्रामार्फत समर्थपणे सांभाळली जाते. इतकेच नव्हे तर बहुसंख्य उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल ही शेतीमधूनच प्राप्त


होतो. म्हणजेच एका बाजूला जीवनावश्यक गरजांची पूर्तता करणे व दुसऱ्या बाजूला देशाच्या औद्योगिकरणाला सहाय्य करणे अशी दुहेरी भूमिका शेती वटविते. म्हणूनच शेतीला अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे. म्हणजेच एका बाजूला जीवनावश्यक गरजांची पूर्तता करणे व दुसऱ्या बाजूला देशाच्या औद्योगिकरणाला सहाय्य करणे अशी दुहेरी भूमिका शेती वटविते. म्हणूनच शेतीला अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान आहे. अभ्यास क्षेत्रातील लहान मोठे लाखो शेतकरी, नगदी पिके म्हणून कांदा या पिकांची लागवड करतात थोड्या काळात कमी भांडवली खर्चात विहीर बागायतीवर किफायतशीर उत्पन्न देणारी ही हुकमी पिके आहेत. ग्रामीण भागातील लाखो शेतमजूरांना रोजगार मिळवून देण्याचे ते हमखास साधन आहे. नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रात सर्वाधिक कांदा उत्पादक, उत्पादकता आणि क्षेत्रफळदृष्ट्या अग्रेसर असल्याचे संशोधनावरून स्पष्ट होते. त्याचप्रमाणे नाशिक जिल्हयामध्ये १५ तालुके असून त्यापैकी १३ तालुक्यात कांदा पिकाचे उत्पादन घेतलं जात आहे त्या पैकी सटाणा तालुका देखील कांदा उत्पादन आणि उत्पन्ना साठी अग्रेसर आहे.

**बिजसंज्ञा:** रब्बी , उत्पादन

**अभ्यासक्षेत्र :**

सटाणा शहर महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यातील बागलण तालुक्यातील महत्वाचे शहर आहे. सटाणा शहराचा अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार २०° ३५" ३७' उत्तर ते ७४° १२' पूर्व या दरम्यान आहे. सटाणा शहराची समुद्र सपाटीपासून सरासरी उंची ५४४ मीटर (१७८४ फुट) असून या तासिलात तिळवण, पिसोळ, साल्हेर या ऐतिहासिक किल्ल्याचा समावेश आहे. सन २०११ नुसार सटाणा नगराची एकूण लोकसंख्या ३७७०१ एव्हडी आहे.

**गुगल नकाशा स्थान विस्तार क्र: १**




**उदिष्ट :** सटाणा तालुक्यातील रब्बी कांदा पिक उत्पन्नात बदल आढळतो.

**संशोधन पद्धती :**

सबंधित संशोधन निबंध पूर्ण करण्यासाठी दुय्यम माहितीचा वापर केला असून या साठी सामाजिक आर्थिक समालोचन, तसेच टक्केवारी या सूत्राचा वापर केला आहे

Cosmos Multidisciplinary Research E-Journal    Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 5.69    ISSN No. 2456-1665

सारणी क्र.१ सटाणा तालुक्यातील मंडळ निहाय रब्बी कांदा पिकाचे उत्पन्न २०१७ -१८

| अ.क्र | मंडळ | प्लॉटचे एकूण उत्पन्न | टक्केवारी | प्रती हेक्टर उत्पन्न | टक्केवारी | सुकवणी पूर्वी उत्पन्न (किग्र) | टक्केवारी | सुकवणी नंतर उत्पन्न (किग्र) | टक्केवारी | सुकवणी नंतर हेक्टरी उत्पन्न (किग्र) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सटाणा | 227 | 22.51 | 30266.67 | 22.49 | 15 | 20 | 14.2 | 19.83 | 28953.09 | 22.49 |
| २ | ब्राम्हणगाव | 195 | 19.33 | 26000 | 19.32 | 15 | 20 | 14.43 | 20.15 | 24871.6 | 19.32 |
| ३ | नामपूर | 233 | 23.1 | 31186.67 | 23.17 | 15 | 20 | 14.52 | 20.28 | 29833.17 | 23.17 |
| ४ | वीरगाव | 180 | 17.85 | 24000 | 17.83 | 15 | 20 | 14.13 | 19.73 | 22958.4 | 17.83 |
| ५ | ताहाराबाद | 173.6 | 17.21 | 23146.67 | 17.2 | 15 | 20 | 14.32 | 20 | 22142.1 | 17.2 |
| | एकूण | 1008.6 | 100 | 134600.01 | 100 | 75 | 100 | 71.6 | 100 | 128758.36 | 100 |

स्त्रोत : नाशिक जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन सन २०१७-१८

सन २०१७-१८ मध्ये अभ्यास क्षेत्रात रब्बी कांदा पिकाचे प्लॉटचे एकूण उत्पन्न १००८.६ मी एव्हडे होते तर सर्वाधिक उत्पन्न नामपूर मंडळात २३३ मी असून सर्वात कमी प्लॉटचे एकूण उत्पन्न ताहाराबाद मंडळात १७३.६ आढळून येते. तर प्रती हेक्टर रब्बी कांदा पिकाचे उत्पन्न अभ्यासले असता एकूण उत्पन्न १३४६००.०१ असून सर्वाधिक प्रती हेक्टरी रब्बी कांदा उत्पन्न नामपूर मंडळात ३११८६.६७ आहे तर सर्वात कमी प्रती हेक्टरी रब्बी कांदा उत्पन्न २३१४६.६७ ताहाराबाद मंडळात आढळून येते. तर सुकवणी पूर्वी एकूण रब्बी कांदा उत्पन्न ७५ कि.ग्र आढळते तर इतर सर्व मंडळात अनुक्रमे १५ कि.ग्र आहे.तर सुकवणी नंतर एकूण रब्बी कांदा पिक उत्पन अभ्यासले असता ७१.६ कि.ग्र निदर्शनास येते त्याचप्रमाणे सुकवणी नंतर हेक्टरी रब्बी कांदा पिक उत्पन्न पाहता एकूण उत्पन्न १२८७५८.३६ कि.ग्र असून विविध मंडळानुसार सर्वाधिक प्रमाण नामपूर मंडळात २९८३३.१७ तर सर्वात कमी प्रमाण ताहाराबाद मंडळात २२१४२.१ कि.ग्र आहे.

सारणी क्र.२ सटाणा तालुक्यातील मंडळ निहाय रब्बी कांदा पिकाचे उत्पन्न २०२२ - २३

| अ.क्र | मंडळ | प्लॉटचे एकूण उत्पन्न | टक्केवारी | प्रती हेक्टर उत्पन्न | टक्केवारी | सुकवणी पूर्वी उत्पन्न (किग्र) | टक्केवारी | सुकवणी नंतर उत्पन्न (किग्र) | टक्केवारी | सुकवणी नंतर हेक्टरी उत्पन्न (किग्र) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सटाणा | 615.35 | 29.33 | 41023.33 | 21.57 | 30 | 28.57 | 28.92 | 28.59 | 39517.78 | 21.57 |
| २ | ब्राम्हणगाव | 184.8 | 8.81 | 24640 | 12.96 | 15 | 14.29 | 14.4 | 14.24 | 23735.71 | 12.96 |
| ३ | नामपूर | 728.8 | 34.73 | 48586.67 | 25.55 | 30 | 28.57 | 28.93 | 28.6 | 46803.54 | 25.55 |
| ४ | वीरगाव | 186.7 | 8.9 | 24893.33 | 13.09 | 15 | 14.29 | 14.46 | 14.3 | 23979.75 | 13.09 |
| ५ | ताहाराबाद | 382.64 | 18.24 | 51018.67 | 26.83 | 15 | 14.29 | 14.44 | 14.28 | 49146.28 | 26.83 |
| | एकूण | 2098.29 | 100 | 190162 | 100 | 105 | 100 | 101.15 | 100 | 183183.06 | 100 |

स्त्रोत : नाशिक जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन सन २०२२ -२३


सन २०२२ - २३ या कालावधीत सटाणा तालुक्यात रब्बी कांदा प्लॉटचे एकूण उत्पन्न २०९८.२९ एव्हडे आहे तर मंडळ निहाय सर्वाधिक रब्बी कांदा पिक उत्पन्न नामपूर मंडळात ७२८.८ असून सर्वात कमी उत्पन्न ब्राम्हणगाव मंडळात १८४.८ इतके निदर्शनास येते. इतके निदर्शनास येते तर प्रती हेक्टर रब्बी कांदा उत्पन्न सर्वाधिक प्रमाण ताहाराबाद मंडळात ५१०१८.६७ असून सर्वात कमी उत्पन्न ब्राम्हणगाव मंडळात २४६४० आढळून येते. तर सुकवणी पूर्वी रब्बी कांदा एकूण उत्पन्न १०५ कि.ग्र असून सर्वाधिक प्रमाण सटाणा मंडळात ३० कि.ग्र एव्हडे आहे. तर सुकवणी नंतर रब्बी कांदा पिक उत्पन्न १०१.१५ कि.ग्र इतके आढळून येते. तर रब्बी कांदा पिक सुकवणी नंतर एकूण हेक्टरी उत्पन्न १८३१८३.०६ कि.ग्र एव्हडे असून सर्वाधिक प्रमाण ताहाराबाद मंडळात ४९१४६.२८ कि.ग्र. एव्हडे आहे तर कमी प्रमाण ब्राम्हणगाव मंडळात २३७३५.७१ कि.ग्र आढळून येते.

सारणी क्र. ३ सटाणा तालुक्यातील रब्बी कांदा पिक उत्पन्नातील फरक

| अ.क्र | मंडळ | प्लॉटचे एकूण उत्पन्न | प्रती हेक्टर उत्पन्न | सुकवणी पूर्वी उत्पन्न (किग्र) | सुकवणी नंतर उत्पन्न (किग्र) | सुकवणी नंतर हेक्टरी उत्पन्न (किग्र) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सटाणा | 6.82 | -0.92 | 8.57 | 8.76 | -0.92 |
| २ | ब्राम्हणगाव | -10.52 | -6.36 | -571 | -5.91 | -6.36 |
| ३ | नामपूर | 11.63 | 2.38 | 8.57 | 8.32 | 2.38 |
| ४ | वीरगाव | -8.95 | -4.74 | -5.71 | -5.43 | -4.74 |
| ५ | ताहाराबाद | 1.03 | 9.63 | -5.71 | -5.72 | 9.63 |

स्त्रोत : नाशिक जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन सन २०२२ -२३

आलेख क्र. १ सटाणा तालुक्यातील रब्बी कांदा पिक उत्पन्नातील बदल



सन २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत सटाणा तालुक्यात मंडळ निहाय रब्बी कांदा पिक उत्पन्नात बदल आढळतो. रब्बी कांदा पिक उत्पन्नातील प्लॉटची सर्वाधिक वाढ नामपूर मंडळात ११.६३ टक्के आढळून येते तर सर्वात कमी घट ब्राम्हणगाव मंडळात -१०.५२ टक्के निदर्शनास आली आहे. तसेच प्रती हेक्टर रब्बी कांदा उत्पन्नाचा अभ्यास केला असता सर्वाधिक वाढ तहरापूर मंडळात ९.६३ टक्के असून सर्वाधिक घट अनुक्रमे ब्राम्हणगाव मंडळात -६.३६ टक्के एव्हडी आहे. तर सुकवणी पूर्वी रब्बी कांदा पिक उत्पन्नात सर्वाधिक वाढ नामपूर मंडळात ८.५७ टक्के असून सर्वाधिक घट अनुक्रमे ब्राम्हणगाव, वीरगाव, ताहाराबाद, मंडळात -५.७१ निदर्शनास येते. सटाणा तालुक्यातील मंडळ निहाय रब्बी सुकवणी नंतर कांदा पिक उत्पन्न अभ्यासले असता सर्वाधिक वाढ सटाणा मंडळात ८.७६ टक्के इतकी आहे तर सर्वाधिक घट ब्राम्हणगाव मंडळात -५.९१ आढळून येते. तर सुकवणी नंतर रब्बी कांदा पिक हेक्टरी प्रमाण अभ्यासले असता सर्वाधिक वाढ ताहाराबाद ९.६३ टक्के या मंडळात असून सर्वाधिक घट ब्राम्हणगाव -६.३६ टक्के या मंडळात आढळून येते.

**निष्कर्ष:**

सन २०१७-१८ मध्ये अभ्यास क्षेत्रात रब्बी कांदा पिकाचे प्लॉटचे एकूण उत्पन्न १००८.६ मी एव्हडे होते तर सर्वाधिक उत्पन्न नामपूर मंडळात २३३ मी असून सर्वात कमी प्लॉटचे एकूण उत्पन्न ताहाराबाद मंडळात १७३.६ आढळून येते. सन २०२२ - २३ या कालावधीत सटाणा तालुक्यात रब्बी कांदा प्लॉटचे एकूण उत्पन्न २०९८.२९ एव्हडे आहे तर मंडळ निहाय सर्वाधिक रब्बी कांदा पिक उत्पन्न नामपूर मंडळात ७२८.८ असून सर्वात कमी उत्पन्न ब्राम्हणगाव मंडळात १८४.८ इतके निदर्शनास येते.

सन २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत सटाणा तालुक्यात मंडळ निहाय रब्बी कांदा पिक उत्पन्नातील प्लॉटची सर्वाधिक वाढ नामपूर मंडळात ११.६३ टक्के आढळून येते तर सर्वात कमी घट ब्राम्हणगाव मंडळात -१०.५२ टक्के निदर्शनास आली आहे. तसेच प्रती हेक्टर रब्बी कांदा उत्पन्नाचा अभ्यास केला असता सर्वाधिक वाढ तहरापूर मंडळात ९.६३ टक्के असून सर्वाधिक घट अनुक्रमे ब्राम्हणगाव मंडळात -६.३६ टक्के एव्हडी आहे. सुकवणी पूर्वी रब्बी कांदा पिक उत्पन्नात सर्वाधिक वाढ नामपूर मंडळात ८.५७ टक्के असून सर्वाधिक घट अनुक्रमे ब्राम्हणगाव, वीरगाव, ताहाराबाद, मंडळात -५.७१ निदर्शनास येते. सटाणा तालुक्यातील मंडळ निहाय रब्बी सुकवणी नंतर कांदा पिक उत्पन्न अभ्यासले असता सर्वाधिक वाढ सटाणा मंडळात ८.७६ टक्के इतकी आहे तर सर्वाधिक घट ब्राम्हणगाव मंडळात -५.९१ आढळून येते. तर सुकवणी नंतर रब्बी कांदा पिक हेक्टरी प्रमाण अभ्यासले असता सर्वाधिक वाढ ताहाराबाद ९.६३ टक्के या मंडळात असून सर्वाधिक घट ब्राम्हणगाव -६.३६ टक्के या मंडळात आढळून येते.

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

**संदर्भ :**

१. भोंगळे सुधीर (२००२)," कृषी चिंतन " अमेय प्रकाशन, पुणे.
२. देशमुख प्रभाकर(२००३), "भारतीय अर्थव्यवस्था" पिंपळापुरे अंड कंपनी प्रकाशन, नागपूर.
३. वि. ग. रूळ (२००४), "कांदा लसून" अतुल बुक प्रकाशन, पुणे.
४. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी कृषी दर्शन २००४
५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल २०११
६. नाशिक जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन २०१७- २०२३
**७.** Food and agricultural organization (FAO)